# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ७९ वी बैठक दिनांक २६ सप्टेंबर २०१३

### ठराव

मा. ना. शशिकांत शिंदे, मंत्री, जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ) व अध्यक्ष, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ यांच्या अध्यक्षतेखाली नियामक मंडळाची ७९ वी बैठक दि. २६ सप्टेंबर २०१३ रोजी मा. मंत्रीमहोदयांचे विधानभवनातील दालन क्र. २१४-अ, विधानभवन, मुंबई येथे संपन्न झाली.

सदर बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य, विशेष निमंत्रित, सदस्यांचे प्रतिनिधी व निमंत्रित उपस्थित होते.

**सन्माननीय सदस्य**

१. मा. ना. शशिकांत शिंदे ... मंत्री, जलसंपदा (कृखोपाम) व अध्यक्ष

२. मा. ए. बा. पाटील ... प्रधान सचिव (जप्र व वि) व सदस्य

३. इं. शि. मा. उपासे ... कार्यकारी संचालक व सदस्य सचिव

**नियामक मंडळाच्या सदस्यांचे प्रतिनिधी**

१. श्री. यु. ल. वाघमारे ... अप्पर मुख्य सचिव (नियोजन) व सदस्य यांचे प्रतिनिधी

**निमंत्रित अधिकारी**

१. इं. च. आ. बिराजदार ... मुख्य अभियंता (विप्र), पुणे

२. श्री. अजित मोरे ... मुख्य लेखा व वित्त अधिकारी (महामंडळ)

३. श्री. आर. डी. खडतरे ... उपायुक्त (पुनर्वसन), पुणे

बैठकीच्या सुरुवातीस कार्यकारी संचालक व सदस्य सचिवांनी मा. अध्यक्ष, मा. उपाध्यक्ष, सन्माननीय सदस्य व उपस्थितांचे स्वागत केले. तद्‌नंतर बैठकीत विषयवार चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यांत आले.

**"मान्य"**

**कार्यकारी संचालक**
**म.कृ.खो.वि.म, पुणे**

**मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)**
**व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे**

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ७९ वी बैठक दिनांक २६ सप्टेंबर २०१३

ठराव

**ठराव क्रमांक ७९/१**

"नियामक मंडळाच्या ७७ व्या बैठकीत पारीत केलेल्या ठरावांवर करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल नियामक मंडळाच्या अवलोकनार्थ सादर केला असल्याने या विषयाबाबत कोणताही ठराव पारीत करण्यात आला नाही"

**ठराव क्रमांक ७९/२**

"ठराव करण्यात येतो की, नियामक मंडळाच्या ७८ व्या बैठकीत पारित करण्यात आलेले ठराव  कायम करण्यात येत आहेत"

**ठराव क्रमांक ७९/३**

"ठराव करण्यांत येतो की, मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील जनहित याचिका क्रमांक ७८/१३ श्री. नरसिंह गणपतराव निकम विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर यामध्ये महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांनी स्वत:हून पक्षकार होऊन प्रकरणांमध्ये सामील होणेस व महामंडळाची बाजू न्यायालयासमोर मांडण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यांत येत आहे."

**ठराव क्रमांक ७९/४**

"ठराव करण्यांत येतो की, सन २०१२-१३ या वर्षाचा महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाचा ताळेबंद व प्रकल्प प्रगती लेखा परिशिष्ट क्र. ३ नुसार महामंडळाचे सनदी लेखापाल यांनी तयार केला असून त्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

**ठराव क्रमांक ७९/५**

"ठराव करण्यांत येतो की, शासन अनुदान ज्या प्रमाणात प्रत्येक तिमाहीमध्ये वितरीत केले जाते. त्यानुसार अेआयबीपी अंतर्गत प्रकल्पांना सुद्धा निधी वितरीत होण्याबाबत शासनास प्रस्ताव सादर करावा. सद्य:स्थितीमध्ये किमान राज्य शासनाचा पूर्ण हिस्सा त्वरीत वितरीत करणेबाबत विनंती करावी."

"मान्य"

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ७९ वी बैठक दिनांक २६ सप्टेंबर २०१३

ठराव क्रमांक ७९/६

"ठराव करण्यांत येतो की, महामंडळाकडील ज्या प्रकल्पाचे सुधारित प्रशासकीय मान्यता अहवाल शासनास सादर झाले आहेत त्यास लवकर सुधारित प्रशासकीय मान्यता देणेबाबत शासनास विनंती करण्यात यावी. जे सुधारित प्रशासकीय मान्यता अहवाल SLTAC व क्षेत्रिय स्तरावर आहेत त्याची शेरे पुर्तता करुन ते शासनास सादर करण्याबाबत पाठपुरावा करावा आणि ज्या प्रकल्पावर कोर्ट केसेस, कलम-१८ व भूसंपादनाची देयके त्वरीत जमा करणे आवश्यक आहे त्याबाबत खास बाब म्हणून परवानगी मिळणेबाबत स्वतंत्र प्रस्ताव शासनास सादर करावा"

मा. अध्यक्ष यांचे परवानगीने आयत्या वेळेचे विषय :

ठराव क्रमांक ७९/७

"ठराव करण्यात येतो की, पुरंदर उपसा सिंचन योजनेंतर्गत मौजे कोळविहीरे, मौजे नावळी व मौजे मावडी क.प., ता. पुरंदर, जि. पुणे या तीन गावांतील पाझर तलाव गाव तलावामध्ये पुरंदर उपसा सिंचन योजनेचे पाणी उपलब्ध करुन देणेबाबत मा.खासदार सुप्रियाताई सुळे, मा.आमदार श्री.विजय शिवतारे, माजी आमदार श्री. अशोक टेकावडे, मा.प्रा. दिगंबर दुर्गाडे, चेअरमन, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, पुणे, मा.श्री. माणिकराव झेंडे, उपसभापती, पंचायत समिती, पुरंदर तसेच तेथील ग्रामस्थांची आग्रही मागणी असल्याने, मुळा-मुठा नदीमध्ये जादाचे पाणी उपलब्ध असताना व योजनेसाठी उपलब्ध असलेल्या पाण्यामधून लाभक्षेत्रातील अन्य भागातून मागणी नसतानाच्या काळात पुरंदर तालुक्यात वारंवार उदभवणारी दुष्काळसदृष्य परिस्थिती विचारात घेऊन पुरंदर उपसा सिंचन योजनेतून मौजे कोळविहीरे, मौजे नावळी व मौजे मावडी क.प. या तीन गावांच्या क्षेत्रातील तलाव, नाला बंडींग इत्यादी पाण्याचे स्त्रोत भरून देणेस नियामक मंडळाची तत्वत: मान्यता देण्यांत येत आहे. त्यानुसार शासनास अहवाल सादर करावा"

ठराव क्रमांक ७९/८

"ठराव करणेत येतो की, वसना व वांगणा उपसा सिंचन योजनेंतर्गत धरण बांधकाम नसलेने बुडीत क्षेत्र येत नाही. या दोनही प्रकल्पास पुनर्वसन करावे लागत नाही. तरी सदर योजनांच्या लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांच्या जमीन ७/१२ वरील पुनर्वसनाचे असणारे शिक्के कमी करणेस महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाची हरकत नाही. याबाबत पुढील योग्य ती कार्यवाही महसूल व पुनर्वसन विभागाकडून करण्यात यावी."

"मान्य"

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे

## महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ७९ वी बैठक दिनांक २६ सप्टेंबर २०१३

**ठराव क्र. ७९/९**

**"ठराव करण्यात येतो की, मौजे माणिकडोह (खामगांव), ता.जुन्नर, जि.पुणे या गावातील गट क्र.७२५ क्षेत्र ०.९१ हेक्टर या महामंडळाच्या ताब्यातील जागेपैकी ८,००० चौ.मी. क्षेत्र महाराष्ट्र राज्य विद्युत महावितरण कंपनीस ३३/११ केव्ही उपकेंद्रासाठी देणेसाठी जिल्हाधिकारी, पुणे यांनी त्यांचे पत्र क्र. महसूल शाखा/पमग/कावि/११३२, दि.२६/०९/२०१३ नुसार मागणी केली आहे. सदर जागेची किंमत महामंडळास मिळण्याच्या अटीवर जिल्हाधिकारी यांचेकडे वर्ग करण्यास मान्यता देण्यात येत आहे."**

तद्नंतर मा. अध्यक्ष यांचे परवानगीने कार्यकारी संचालक व सदस्य सचिव यांनी मा. अध्यक्ष, मा. उपाध्यक्ष, सन्माननीय सदस्य व उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

**"मान्य"**

**(इंजि. शि. मा. उपासे)**
**कार्यकारी संचालक**
**म.कृ.खो.वि.म, पुणे**

**(मा. ना. श्री. शशिकांत शिंदे)**
**मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)**
**व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे**